**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्ध पत्रक**

## ❖ मिरा भाईंदर शहरातील अनधिकृत बोर्ड व बॅनरवर कारवाई

मिरा भाईंदर शहरात मिरा भाईंदर महानगरपालिकाच्या अतिक्रमण विभागाने शहरातील अनधिकृत बोर्ड व बॅनरसमस्येचे गांभीर्याने विचार करीत मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ शर्मा (भा. प्र. से) यांच्या आदेशानुसार अतिक्रमण विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शहरातील बेकायदेशीर बॅनरवर कारवाई केलेली आहे. अतिक्रमण विभाग अनधिकृत बोर्ड व बॅनर्सवर दैनंदिन कारवाई करत असून गणेशोत्सवादरम्यांन ११३३ बॅनर्सवर कारवाई करण्यात आलेली आहे.

अतिक्रमण विभागाच्या या कारवाईमुळे अशा बेकायदेशीर कृतींना आळा घालण्यात येत आहे. शहराच्या स्वच्छ,सुंदर आणि शिस्तबद्ध प्रतिमेसाठी ही कारवाई अत्यंत महत्वाची असून सर्व संस्था, मंडळे, राजकीय पक्ष आणि नागरिकांनी  बॅनर्स व बोर्ड न लावून महानगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे